## अधिसूचना

सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०००

**भारताचे संविधान**

क्र.आरटीआर १०९१/प्र.क्र.२२६/सेवा-३, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यांत आलेल्या शक्तींचा वापर करुन आणि महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी संबधीत नेमणूकीचे विनियमन करण्यासंबंधी सद्या अस्तित्वात असलेले सर्वनियम,आदेश व अनुदेश निष्प्रभावी करुन महाराष्ट्राचे राज्यपाल या द्वारे महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा संचालनालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी या पदाच्या सेवा भरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, जसे :-

१. या नियमांना आरोग्य सेवा संचालनालयातील "महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी ( सेवा प्रवेश )नियम २००० "असे संबोधण्यांत यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :-

अ) "आयोग"म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
ब) "पदवी " म्हणजे सांविधिक विद्यापीठाची पदवी,
क) "संचालनालय" म्हणजे महाराष्ट्र शासनाचे आरोग्य सेवा संचालनालय,
ड) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन,
इ) "निवड "म्हणजे शासनाने नियुक्त केलेल्या समितीकडून व्यक्तिंची झालेली निवड
फ) "सांविधिक विद्यापीठ"म्हणजे अस्तित्वात असलेल्या कायदयानुसार स्थापित केलेले विद्यापीठ

३. संचालनालयामधील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी या पदावर करावयाची नेमणूक पुढील पैकी कोणत्याही एका प्रकारे करता येईल.-

अ) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-क मधील पदावर काम करीत असलेल्या व किमान ३ वर्षे नियमित सेवा केलेल्या आणि खंड क (दोन) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व्यक्तिंमधून जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती देवून नेमणूक करता येईल.

ब) जिल्हा तांत्रिक सेवा गट-क (आरोग्य) मधील पदावर काम करीत असलेल्या व त्यासंवर्गात किमान ३ वर्षे नियमित सेवा केलेल्या आणि खंड क (दोन) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणा-या व्यक्तिंमधून जेष्ठता व गुणवत्तेच्या आधारे "निवड"करुन नेमणूक करता येईल.

क) ज्या उमेदवारांच्याबाबतीत पुढील शर्ती पुर्ण होत असतील अशा व्यक्तिंमधून नामनिर्देशनाने करता येईल,-

(एक) ज्या अगोदर पासून शासकिय सेवेत नसतील आणि त्यांचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त नसेल आणि

(दोन) पुढील अर्हता धारण करीत आहे ,-

(अ) सांविधीक विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी किंवा भारतीय वैद्यकीय परीषद अधिनियम १९५६ ला जोडलेल्या प्रथम किंवा द्वितीय अनुसूचित विनिर्दीष्ट केलेली अन्य कोणतीही अर्हता किंवा

(ब) महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायिक अधिनियम १९६१ ला जोडलेल्या भाग अ -१ अनुसूचित विनिर्दीष्ट केलेली शुध्द आयुर्वेद मधील पदवी किंवा बी.ए.एम.एस. पदवी .

परंतु असे की सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही वैद्यकीय शास्त्राची पदव्युत्तर पदवी धारण करणा-या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

परंतु आणखी असे की ,विहीत केलेली कमाल वयोमर्यादे संबंधीची शर्त ही,असाधारण अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत शासन आयोगाच्या शिफारशीनुसार शिथिल करु शकेल.

RRULEs

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

परंतु आणखी असे की वरील उपखंड (ब) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांची नियुक्ती नियम ५ मध्ये तरतूद केल्यानुसार शुध्द आयुर्वेद पदवी धारकांसाठी आरक्षित केलेल्या पदावर करण्यात येईल.

ड) सामान्य राज्य सेवा (आरोग्य ) गट-अ किंवा राज्य शासनाच्या अधिपत्याखालील इतर सेवामधील वरील खंड क (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करणा-या योग्य अधिका-यांच्या बदलीने.

४. नियम तीन मध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार पदोन्नती ,निवड आणि नामनिर्देशन यांचे प्रमाण अनुक्रमे ०५:२०:७५ असे राहील.

५. नियम ३ मधील खंड (क) (दोन) (ब) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करणा-या उमेदवारांची नियुक्ती संचालनालयाच्या अधिपत्याखाली प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि प्राथमिक आरोग्य पथकं येथे करण्यात येईल. प्राथमिक आरोग्य केंद्रे व प्राथमिक आरोग्य पथकांकरीता मंजूर असलेल्या एकूण पदांच्या २५ टक्के पदे आयुर्वेद पदवीधारकांसाठी पदोन्नती,निवड व नामनिर्देशनाने अनुक्रमे २५:५०:२५ प्रमाणात नियुक्तीकरीता आरक्षित राहतील.

परंतु असे की, नियम ३ मधील खंड (क) (दोन) (ब) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण करणारे एकूण वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाण महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रु.८०००-१३५०००) मधील एकूण अधिका-यांच्या ३३ टक्क्यांपेक्षा जास्त असता कामा नये.

परंतु आणखी असे की , नियम ३ मधील खंड (क) (दोन) (ब) च्या नियम ३ मध्ये नमूद केलेली अर्हता धारण केलेले आवश्यक संख्याइतके उमेदवार नियुक्तीसाठी उपलब्ध न झाल्यास ,त्यांच्या साठी आरक्षित असलेली पदे इतर लायक उमेदवारांमधून भरली जातील.

६. सदर पदावर नामनिर्देशनाने नेमणूक झालेली व्यक्ती दोन वर्षाच्या कालावधीपर्यंत परिवीक्षाधीन राहील-जर परिवीक्षाधीन कालावधीची दोन वर्षे समाधानकारकरित्या पूर्ण करण्यास व्यक्ती अयशस्वी ठरल्यास,सदर कालावधी शासनास योग्य वाटल्यास एक वर्षापर्यंतच वाढविता येईल. या वाढीव कालावधीमध्येही काम असमाधानकारक राहील्यास त्याची /तीची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

७. सदर पदावर पदोन्नतीने किंवा बदलीने किंवा नामनिर्देशनाने नेमणूक झालेल्या व्यक्तीस :

अ) वेळोवेळी विहीत केलेले प्रशिक्षण घ्यावे लागेल किंवा विहीत परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल किंवा दोन्ही आणि,

ब) या परीक्षापूर्वीच उत्तीर्ण झाली नसेल अथवा या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नसेल तर त्याबाबतीत विहित केलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

८. या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस जर शासनास आवश्यकता वाटली तर कोणत्याही भारतीय संरक्षण सेवेमध्ये किंवा भारताच्या संरक्षणाशी निगडीत असलेल्या पदावर भारतात किंवा भारताबाहेर कमीत कमी चार वर्षाच्या कालावधीसाठी(प्रशिक्षणासाठी खर्च झालेला कालावधी धरुन ) भारतसरकारने वेळोवेळी निश्चित केलेल्या अटी व शर्तीनुसार सेवा बजवावी लागेल.

परंतु ज्यांच्या किंवा जिच्या नेमणूकीच्या तारखेपासून १० वर्षे सेवा पूर्ण झाली आहे अथवा सर्वसाधारणपणे ज्याच्या किंवा जिच्या वयाची ४५ वर्षे पूर्ण झाली आहेत अशा व्यक्तीस वरीलप्रमाणे सेवा बजवावी लागणार नाही.

९. या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यामध्ये कोठेही बदलीस पात्र असेल.

१०. या पदावर नेमणूकीसाठी निवड झालेल्या व्यक्तीला या पदावर रुजू होण्यापूर्वी महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम १९६५ (महा.१९६५ चा ४६) या अन्वये वैद्यकीय व्यावसायिक म्हणून आपली नोंदणी करून घ्यावी लागेल किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ (१९५६ चा १०२ ) नुसार

RRULEs

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

ठेवलेल्या भारतीय वैद्यकीय नोंदवहीमध्ये तिचे नांव आधीच नोंदलेले असेल तो व्यक्ती याला अपवाद राहील.

११. वरील नियमात काहीही अंतर्भूत असले तरी,हे नियम अस्तित्वात येण्यापूर्वी पदोन्नतीने बदलीने किंवा नामनिर्देशनाने तात्पुरत्या स्वरुपात ज्यांना नियुक्त करण्यात आले होते .त्यांच्यासाठी आयोगाने दि.१७.४.८३ रोजी विशेष चाचणी परीक्षा घेतली आणि ज्यांच्या नियुक्त्या आयोगाशी विचारविनिमय करुन नियमित करण्यात आल्या आहेत,अशा महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ मधील नियुक्त्या पदोन्नतीने ,निवडीने किंवा नामनिर्देशनाने नियमित झाल्या आहेत असे समजण्यात याव.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ज.दि.कांबळे)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner